# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०२२**

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक ०७.०१.२०२२

## मुर्शिदाबाद, प.बंगाल येथील खुनाच्या गुन्हयातील आरोपीस शिताफीने अटक

-----------------------------------------------------

दिनांक १२/१०/२०२१ रोजी दौलताबाद पोलीस स्टेशन जि. मुर्शिदाबाद राज्य- प.बंगाल येथे गु.र.नं. १६९/२०२१ भा.द.वि. कलम ३०२,१२०ब,३४ सह आर्म अॅक्ट २५,२७ अन्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल असून नमूद गुन्हयातील आरोपी यांनी जमीनीच्या वादातून अग्नीशस्त्राचा वापर करुन एका इसमास ठार केले होते. गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडल्यापासून फरार झाले होते.

दिनांक ०५/०१/२०२२ रोजी गुन्हयातील मुख्य पाहीजे आरोपी हा नवी मुंबई परिसरात असलेबाबत श्री. देबाशिष घोष, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दौलताबाद पोलीस स्टेशन जि. मुर्शिदाबाद प.बंगाल यांनी श्री. सुनिल शिंदे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा,कक्ष-१, वाशी नवी मुंबई यांना माहिती दिली. माहिती मिळाल्यानंतर तात्काळ माहितीबाबत खातरजमा करून गुन्हे शाखा,कक्ष-१, वाशी नवी मुंबई चे वपोनि. सुनिल शिंदे, सपोनि. हर्षल कदम,पोना/२८८३ निलेश किंद्रे, पोना/२६८३ शशीकांत जगदाळे,पोना/२९९९ धनाजी भांगरे यांच्या पथकाने गुन्हयाचा तांत्रिक तपास करून तुर्भे पोलीस ठाणे हददीत बोनसरी गाव परिसरात पाच ते सहा तास सापळा रचून नमूद गुन्हयातील मुख्य आरोपी सादीकुल इस्लाम अब्दुल खालेक उर्फ रिंटू शेख वय ४२ वर्षे रा. दादपूर, दौलताबाद जि. मुर्शिदाबाद प.बंगाल यास शिताफीने ताब्यात घेतले. नमूद आरोपीकडे कसोशीने तपास केला असता त्याने गुन्हयाची कबूली देवून तो गुन्हा घडल्यानंतर नवी मुंबई येथे पळून आला होता.नमूद आरोपीस पुढील तपासकामी दौलताबाद पोलीस स्टेशन जि. मुर्शिदाबाद प. बंगाल येथील पोलीस पथकाच्या ताब्यात दिले आहे.

**अटक आरोपीचे नाव-** सादीकुल इस्लाम अब्दुल खालेक उर्फ रिंटू शेख वय ४२ वर्षे रा. दादपूर, दौलताबाद जि. मुर्शिदाबाद प.बंगाल

उत्कृष्ट कामगिरी , तांत्रिक तपास व आरोपीस अटक करणारे पथक

गुन्हे शाखा,कक्ष-१, चे १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे, २) सहा. पोलीस निरीक्षक हर्षल कदम, ३)पोना/२८८३ निलेश किंद्रे, ४)पोना/२६८३ शशीकांत जगदाळे, ५) पोना/२९९९ धनाजी भांगरे ६) चालक/सहा. पो.उप.निरीक्षक प्रदीप लिंगाळे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

--------